# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक १३/०९/२०२२ (मंगळवार)**

**(सायंकाळ)**

---

### अकस्मात मृत्यू

पो.स्टे. खापा :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील मौजा गुमगाव माईन येथे दिनांक ११/०९/२०२२ चे ११.३० वा. सुमारास **ईश्वर रामनाथ कठोते(मृतक) वय ५० वर्ष, रा.गुमगाव माईन खापा** यांची प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचारा करीता ग्रामीण रूग्णालय सावनेर येथे घवुन गेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले. पोस्टे सावनेर येथील मर्ग क्र. ००/२२ कलम १७४ जाफौ चे कागदपत्रे पोस्टे खापा येथे प्राप्त झाल्यावरून सदर मर्ग दाखल करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— कौशल ईश्वर कठोते वय ४६ वर्ष, रा.गुमगाव माईन खापा यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. खापा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास ग्रेड पोउपनि विजय बारई मो.नं ९८२२२८९५७२ हे करीत आहे.

### गळफास लावून मृत्यु

१) पो.स्टे. जलालखेडा :— अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील मौजा पिंपळधारा शिवार येथे दिनांक १२/०९/२०२२ चे ०३.०० वा. सुमारास **राजाभाउ बाबुरावजी झुडपे (मृतक), वय ५८ वर्ष, रा. पिंपळधरा** यांचे पत्नीच्या नावाने तीन एकर शेती असुन व गावातील जगदिश बेले यांची नउ एकर व एकनाथ खुजे यांची तीन एकर शेती ठेक्याने केली होती. सुरुवातीच्या दिवसात पाउस न आल्याने दुबार पेरणी करावी लागली होती त्यामुळे त्यांच्या अंगावर कर्ज होत गेले दोन ते तीन दिवसा पासुन मृतक हे कोणाशी हि बोलत नव्हते कर्जाचे विंवचनेत राहात होते. या कारणावरुन त्यांनी शिवारातील सुभाष कन्हेरे यांचे पडीत शेतात झाडाला नॉयलॉन दोरीने गळफास घेतल्यानंतर ते मृत अवस्थेत आढळून आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— पवन राजाभाउ झुडपे वय २८ वर्ष, रा. पिंपळधरा.ता.नरखेड.यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. जलालखेडा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार धोंडे मो.नं. ८६०५३२२३२२ हे करीत आहे.

२) पो.स्टे. बुटीबोरी :— अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील मौजा माळा शिवार बालभारती ग्राउंड जवळील झुडपी जंगल येथे दिनांक १२/०९/२०२२ चे १३.३० वा. पुर्वी फिर्यादी नामे— महेश माणीकरामजी कुळसुंगे, वय ३४ वर्ष, रा. वार्ड क्र. ४, बुटीबोरी हे बालभारती मैदान परीसरात मशरूम शोध घेण्याकरीता गेले असता बालभारती ग्राउंडचे झाडी झुडपातील परीसरात एका अनोळखी पुरूषाचे कवटी व हाडाचे तुकडे पडलेले तसेच लाल रंगाची बॅग, मोबाईल व पांढरे रंगाचे दोन बुट पांढऱ्या रंगाचा मोबाईल काळया रंगाची घडयाळ एक पॅन्ट व टी—शर्ट चिखलाने माखलेले जमिनीवर पडलेले दिसले व झाडाचे फांदीला हिरव्या रंगाचा दुपट्टा गळफास घेतलेल्या स्थितीत बांधलेला असुन दिसत्या परिस्थिती वरून सदर अनोळखी व्यक्तीने अज्ञात कारणावरूण गळफास घेवुन आत्महत्या केली असावी.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. बुटीबोरी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास मपोउपनि आरती उघडे मो.क्रं. ८३५५९४७४७३ या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर